सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहितीचा अधिकार
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनीः+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्रामः "MEDUCATNSEARCH" फॅक्सः+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळः http:/www.dmer.org

*क्र. संवैशिवसं/मवैप/नोंदणी/बंधपत्र-मुक्तता/अट/जाहिर सूचना/८-अ, दिनांक - २१ सप्टेंबर २०१७*

## ***<u>बंधपत्रित वैद्यकीय व्यावसायिंकाकरीता जाहीर सूचना</u>***

*राज्यमध्ये शासन / महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातून पदवी / पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका/ अतिविशेषोपचार पदवी अर्हता प्राप्त करणाऱ्या सर्व उमेदवारांना बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक आहे. सदरील सेवा न केल्यास त्याबाबत दंडात्मक रक्कम भरावी लागते. सदर नियमांचे पालन न करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांच्या बाबतीत शासन परिपत्रक क्र. एएमसी-०८१६/प्र.क्र.३३/ अधिनियम, दिनांक ०५.०७.२०१७ निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकांनुसार बंधपत्रित सेवा न करणे हे या पुढे अनैतिक वागणुक (निती संहीतेचा भंग) असे समजण्यात येणार आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निती संहितेमधील नियम क्रमांक १.९ नुसार (२००२) वैद्यकीय व्यावसायिंकांकरीता राज्य शासनाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचा भंग / अनैतिक वागणूक केल्यास वैद्यकीय व्यावसायिकावर महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कायदा, १९६५ च्या कलम २२ (१) नुसार कारवाई करता येते. सदर कारवाई करण्याबाबत दिनांक ०५.०१.२०१७ च्या शासन परिपत्रकांनुसार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना "नोडल अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे.*

*महाराष्ट्र राज्यामध्ये शासन / महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातून पदवी / पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका/ अतिविशेषोपचार पदवी अर्हता प्राप्त केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांना या जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, त्यांच्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडील नोंदणीच्या नुतनीकरणाच्या वेळेस बंधपत्रमुक्त केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण करता येणार नाही. व्यवसाय नोंदणी करण्यास पात्र नसणाऱ्या अशा वैद्यकीय व्यावसायिकांना नोंदणी न झाल्यास वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही व ते बोगस डॉक्टर समजून महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार कडक कारवाईस पात्र राहतील. अशा व्यावसायिकांवर महाराष्ट्र वैद्यक परिषदेमार्फत विहीत प्रक्रियेद्वारे कारवाई करण्याचे अधिकार परिषदेला देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे या पुढे नुतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या सर्व बंधपत्रित वैद्यकीय व्यावसायिकांनी याची नोंद घ्यावी व नुतनीकरणापुर्वीच बंधपत्र मुक्त प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी संबंधित अधिष्ठातांमार्फत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई या कार्यालयाकडे अर्ज सादर करावा. बंधपत्र मुक्त प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे बंधपत्रित वैद्यकीय व्यावसायिकांचे नुकसान झाल्यास संबंधित वैद्यकीय व्यावसायिक त्यास स्वत: जबाबदार राहील याची सर्व बंधपत्रित वैद्यकीय व्यावसायिकांनी कृपया नोंद घ्यावी.*

सही/-

**संचालक**

**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

GOVERNMENT OF MAHARASHTRA
RIGHT TO INFORMATION
DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building 4th floor, St. George's Hospital Compound, P.D'mello Road, Mumbai - 400 001.
Tel. No. - +91-22-22620361-65/22652251/57/59. Telegram "MEDUCATNSEARCH" Fax - +91-22-22620562/22652168
Website : http:/www.dmer.org

No.DMER/MMC/Reg./Bond Release/Condition/Public Notice/8-A Date:21/09/2017

# Notice For Bonded Medical Practioners

All the Medical Practioners, who have obtained Graduate Degree/Post Graduate Degree/Diploma /Superspeciality degree from Government/Municipal Corporation Medical Colleges in Maharashtra, have to complete the required bond service or pay the Bond Penalty. As per Government of Maharashtra Circular No.MMC-0816/C.R.33/Adhiniyam, dated 05.01.2017, non-completion of Bond service will be treated as misconduct as per Medical Council of India, Code of Ethics and Rules 1.9(2002). All the practioners must obey the Government Rules & failing which, action as per 22(1) of Maharashtra Medical Council Act, 1965 would be initiated. The Director of Medical Education and Research has been declared **"Nodal Officer"** to take such action as per Government Circular mentioned above.

All the Medical Practioners who have obtained Graduate Degree/Post Graduate Degree/Diploma/Superspeciality Degree from Government /Municipal Corporation Medical Colleges in Maharashtra are, hereby informed that it is mandatory for them to submit Bond-free certificate at the time of Renewal of Registration to the Maharashtra Medical Council. If such certificate is not produced then the Maharashtra Medical Council is instructed not to renew the registration and such unregistered (Non renewal) medical practioners will be treated as Bogus Doctor and he/she is liable for necessary action as per the Maharashtra Medical Profession Act,1961 by the Maharashtra Medical Council. All the bonded Medical Practioners should obtain bond free certificate from DMER by submitting necessary application through the concerned Dean. All Bonded Medical Practioners should note that they themselves will be responsible for the loss/damages, if instructions, in this notice, are not followed by them. All the bonded Medical Practioners are requested to take note of this notice.

**Sd/-**
**Director**
**Medical Education & Research,**
**Mumbai**